**BDC LIBRARY**
**New Paper Clipping**
*A.Y. 2024-2025*

# पाटणमध्ये आज प्रा. वसंत हंकारे यांचे व्याख्यान

**पाटण :** येथील आधार जनसेवा सामाजिक संस्थेच्यावतीने नुकत्याच झालेल्या महिलादिनाच्या निमित्ताने शुक्रवार २८ रोजी दुपारी १२.१५ वाजता ख्यातनाम प्रेरणादायी वक्ते प्रा.वसंत हंकारे यांचे 'भरकटलेली तरूणाई व न समजलेले आई–बाप समजून घेताना' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

येथील सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या आधार जनसेवा सामाजिक संस्थेच्यावतीने प्रतिवर्षी जागतिक महिला दिन साजरा करण्यात येत आहे. नुकत्याच झालेल्या जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने येथील कोयना एज्युकेशन सोसायटीच्या हॉटेल मॅनेजमेंटच्या मैदानावर होत असलेल्या या प्रेरणादायी व्याख्यानप्रसंगी विविध क्षेत्रातील यशस्वी व कर्तबगार महिलांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला आहे.

या प्रबोधनात्मक व प्रेरणादायी व्याख्यानाचा पाटण शहरासह परिसरातील सर्व विद्यार्थी, विद्यार्थिनी, पालक व नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आधार जनसेवा सामाजिक संस्थेच्यावतीने करण्यात आले आहे.